**नि.फौ.ख.क्र.१९/२०१८**
**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३**
**निशाणी क्र. २६**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – प्रसन्न विनायक पवार
**वय** – २९ वर्षे **धंदा** – शिक्षण
**राहणार** – कुडाळ, ता. जावली, जि. सातारा

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.जे.आर.इंगळे</u>**

१. मी कुडाळ येथे माझी आई सुवर्णा, वडील विनायक, भाऊ प्रसाद, वहिणी सोनाली यांच्यासह राहण्यास आहे. २०१७ साली माझे शिक्षण सुरु होते. दि.०५.०५.२०१७ रोजी वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांनी माझ्या आईला शिक्षक कॉलनी येथील आंगणवाडी शाळेत जात असताना सांगितले की, आयडीबीआय बँकेमध्ये जागा निघाल्या आहेत, आमचे एक रिलेटिव आयडीबीआय शाखेत डिओ या पदावर आहेत, जर तुम्ही नोकरीसाठी इच्छुक असाल तर मला आज संध्याकाळपर्यंत येवून भेटा. सदरची बाब मला आईने त्यादिवशी सायंकाळी ०५:०० वाजता शाळेतून घरी आल्यानंतर सांगितली. वर्षा कांबळे व मंगल कांबळे या सांजवात शिक्षण संस्था, मनमंदिर मतिमंद मुलांची शाळा, कुडाळ या शाळेत नोकरीसाठी आहेत. ६ तारखेला वर्षा कांबळे यांनी आईला परत फोन केला की, तुम्ही जर इच्छुक असाल तर भेटायला या. आम्ही ६ तारखेला भेटायला न जाता ०७.०५.२०१७ तारखेला सकाळी १० वाजता माझी आई सुवर्णा, वहिणी सोनाली व मी सांजवात शिक्षण संस्था, मनमंदिर मतिमंद मुलांची शाळा, कुडाळ या शाळेत भेटायला गेलो. भेटायला गेलो असता वर्षा कांबळे व मंगल कांबळे तसेच एक अज्ञात इसम त्याठिकाणी उपस्थित होता. त्यावेळेस वर्षा कांबळे यांनी त्या अज्ञात इसमाची ओळख करुन दिली की, हे आळजापूर, फलटण येथील विजय अर्जून नलवडे आहेत. ते आयडीबीआय बँक, मुंबई येथे डीओ पदावर कार्यरत आहेत आणि हेच तुम्हाला आयडीबीआय बँकेत क्लार्क या पदावर बीकेसी केंद्र, मुंबई येथे नोकरीला लावणार आहेत. त्यानंतर वर्षा कांबळे, मंगल कांबळे, विजय नलवडे यांनी क्लार्क पदाच्या नोकरीसंदर्भात

माहिती सांगितली. त्यावेळेस वर्षा कांबळे बोलताना म्हणाल्या की, या एका पदासाठी साठ हजार रुपये तुम्हाला भरावे लागणार आहेत. यासाठी शिक्षणाची अट बी.ए. किंवा बी.कॉम. असले तरी चालेल. ही रक्कम तुम्हाला दोन दिवसांमध्ये भरावी लागेल. तसेच, या परिक्षेची तारीख २०.०५.२०१७ आहे. तसेच, १७.०५.२०१७ रोजी तुम्हाला मोबाईलवर मेसेज येईल, तो हॉल तिकीट संदर्भात असेल आणि १८.०५.२०१७ रोजी तुम्हाला पोस्टाने हॉलतिकीट येईल असे सांगून झाल्यानंतर आम्ही तिघेही घरी गेलो. ०८.०५.२०१७ तारखेला सकाळी १० वाजता पुन्हा वर्षा कांबळे यांचा आईला फोन आला, त्यावेळेस आम्ही घरातील सर्वजण एकत्र होतो. त्यावेळेस त्यांनी सांगितले, वेळ कमी राहिला आहे, तुम्ही लवकरात लवकर पैसे घेवून मला भेटायला शाळेत या. त्यावेळेस घरातल्यांच्या इच्छेनुसार माझी व वहिणीची इच्छा नसताना मी, आई व वहिणी सोनाली पवार असे चाळीस हजार रुपये घेवून सांजवात शिक्षण संस्था, मनमंदिर मतिमंद मुलांची शाळा, कुडाळ या शाळेत गेलो. वहिणी सोनाली पवार व माझे काम करण्यासाठी आम्हाला एक लाख वीस हजार रुपये सांगितले होते. त्यातील आम्ही वीस हजार रुपयांची माझ्या आईची एफ.डी. मोडून तसेच राहिलेले वीस हजार रुपये बचत गटातून कर्ज घेवून ०८.०५.२०१७ रोजी सकाळी १०:३० वाजता वर्षा कांबळे यांना प्रत्यक्ष भेटून दिले. त्यावेळी वर्षा कांबळे सोबत मंगल कांबळे या हजर होत्या. सदरचे पैसे आम्ही रोख स्वरुपात त्यांना सांजवात शिक्षण संस्था, मनमंदिर मतिमंद मुलांची शाळा, कुडाळ या शाळेत दिले. त्याचवेळेस आम्ही त्यांना सांगितले राहिलेली रक्कम आमचे काम झाल्यानंतर आम्ही देवू, परंतू, वर्षा कांबळे यांनी ०८.०५.२०१७ रोजी दुपारी आईला फोन केला व राहिलेली रक्कम आज संध्याकाळपर्यंत दिली तरच तुम्हाला नोकरी दिली जाईल अन्यथा जे आपण चाळीस हजार रुपये दिलेत ते बुडीत जातील. त्यावेळेस आम्ही सर्वजण घरात होतो. त्यानंतर आम्ही मेढा येथे येवून आईच्या पगारावर डीसीसी बँकेतून कर्ज घेवून राहिलेली ऐंशी हजार रुपये रक्कम वर्षा कांबळे यांना दि.०८.०५.२०१७ रोजी ०५:३० वाजता सांजवात शिक्षण संस्था, मनमंदिर मतिमंद मुलांची शाळा, कुडाळ या शाळेत दिली. त्यावेळी वर्षा कांबळे व मंगल कांबळे याच हजर होत्या. त्यावेळी त्यांनी आम्हाला असे सांगितले की, या रक्कमेबाबत कोणालाही बोलू नका, अन्यथा काम होणार नाही. तुमचे पैसे बुडीस जाणार नाही याची आम्ही खात्री देतो. आम्ही वर्षा कांबळे यांना शाळेची मार्कशीटची झेरॉक्स, शाळा सोडल्याचे दाखल्याची झेरॉक्स, आधारकार्डची झेरॉक्स व दोन फोटो असे कागदपत्र दिले होते. आम्ही त्यांच्या कॉन्टॅक्टमध्ये होतो. त्यांनी आम्हाला दि.१७.०५.२०१७ रोजी हॉल तिकीट संदर्भात व परीक्षेच्या संदर्भात मेसेज येईल असे सांगितले होते, परंतू, तसा

मेसेज त्यादिवशी आम्हाला आला नाही. तसेच, १८.०५.२०१७ पोस्टाने हॉल तिकीट येईल असे सांगितले होते, तेही हॉलतिकीट आम्हाला आले नाही. असे असल्यामुळे मी व महादेव रासकर असे वर्षा कांबळे यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्यादिवशी आमचा कोणताही कॉल उचचला नाही. त्यानंतर आम्ही त्यांना भेटण्यासाठी १८.०५.२०१७ रोजी सायंकाळी ०५:३० वाजता त्यांच्या खडकी या गावी भेटण्यास गेलो. त्यावेळेस तेथे वर्षा कांबळे, मंगल कांबळे व एक अज्ञात व्यक्ती व आणखी एक वयस्कर महिला उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी मला भेटण्यास घरात बोलावले व त्यांना मी म्हणालो की, आम्हाला नोकरीस घेणार नसतील तर आमचे पैसे आम्हाला परत करा. तेव्हा वर्षा कांबळे यांनी मला रोख स्वरुपात ३५,०००/– रुपये दिले व राहिलेली रक्कम तुम्हाला परीक्षा न झाल्यास दुसऱ्या दिवशी दिली जाईल, परंतू ही गोष्ट कोणालाही बोलू नका व बाकीच्यांची राहिलेली रक्कम २१.०५.२०१७ नंतर आम्ही देणार आहोत. त्याचवेळी त्यांनी असे सांगितले की, आपण २०.०५.२०१७ ला मुंबई येथे आयडीबीआय बीकेसी केंद्रावर जावून परीक्षेच्याबाबत चौकशी करुयात. त्यानंतर आम्ही आमच्यासोबत असणारे ७ ते ८ जण प्रायव्हेट गाडी करुन आयडीबीआय बीकेसी केंद्र मुंबई येथे गेलो. तिथं गेल्यानंतर सकाळी १० वाजता बीकेसी केंद्र, आयडीबीआय बँक येथे आम्ही पोहोचलो. त्यावेळेस तिथं वर्षा कांबळे व मंगल कांबळे उपस्थित होत्या. त्या आमच्यासोबत आल्या नव्हत्या. आम्ही सातारा जिल्हयातून आलेले आणखी १० ते १२ विद्यार्थी होतो. १०:३० वाजता आम्ही आयडीबीआयच्या सिक्युरिटी गेटवर परिक्षेबाबत विचारणा केली, त्यावेळी सिक्युरिटी गार्डने आम्हाला असे सांगितले की, मी मॅनेजरला बोलावतो, तुम्ही काय असेल ती त्यांच्याशी चर्चा करा. त्यानंतर बँकेचे मॅनेजर आम्हाला प्रत्यक्ष भेटण्यासाठी गेटवर आले. मॅनेजरचे नाव मला सांगता येणार नाही. मॅनेजर आमच्याशी भेटले, त्यावेळेस त्यांना आम्ही परिक्षेबाबत विचारणा केली, तसेच आम्ही वर्षा कांबळे यांच्या सांगण्यानुसार विजय अर्जून नलवडे या डीओ पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीबाबत मॅनेजर यांच्याकडे विचारणा केली. त्यावेळेस मॅनेजर यांनी असे सांगितले की, १० ते १५ मिनीटांत चौकशी करुन तुम्हाला सांगतो की ही व्यक्ती आहे की नाही ते. १५ मिनीटांनंतर मॅनेजरने सांगितले की, विजय अर्जून नलावडे या नावाची व्यक्ती आयडीबीआय बँक, बीकेसी केंद्रमध्ये तसेच इतर कोणत्याही शाखेमध्ये कार्यरत नाहीत. त्यानंतर आमच्या असे लक्षात आले की, माझी व माझ्यासोबत सर्वांची फसवणुक झाली आहे. त्यावेळेस आम्ही वर्षा कांबळे यांना विचारले की, पुढे काय करुया. त्यावेळी वर्षा कांबळे यांनी आम्हाला असे सांगितले की, आमची मंत्रालयात ओळख आहे, आम्ही तेथून माहिती घेतो तोपर्यंत कोठेही

कम्प्लेन्ट नोंदवू नका. तसेच ,तुम्ही परत गेलात तरी चालेल. असे सांगितल्यानंतर आम्ही पुन्हा २०.०५.२०१७ रोजी कुडाळ या माझ्या गावी रात्री उशीरा माघारी आलो. २१.०५.२०१७ रोजी मी व माझ्यासोबत असणारे सहकारी म्हणजेच ज्यांची नोकरीसाठी फसवणुक झाली ते सगळे एकत्र येवून कुडाळ येथील पोलीस स्टेशनला तक्रार देण्यास गेलो. त्यावेळेस आमची तक्रार घेतली गेली नाही. त्यावेळी त्याठिकाणी पोलीस अधिकारी म्हणून झांजुर्णे साहेब हजर होते. त्यावेळी त्यांनी आमची कम्प्लेन्ट न घेता त्यांनी मेढा पोलीस स्टेशन येथे जावून तक्रार करा असे सांगितले कारण तुम्ही सगळेजण वेगवेगळया भागातील आहात. त्यांच्या सांगण्यानुसार आम्ही २१.०५.२०१७ रोजी सायंकाळी ०४:०० वाजता मेढा पोलीस स्टेशन येथे आलो व तक्रार देण्याबाबत पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांना विचारले त्यावेळेस त्यांनी फसवणुकीबाबत आमच्याकडून माहिती घेतली व त्यांनी पुन्हा आम्हाला कुडाळ पोलीस स्टेशनला जावून गुन्हा नोंद करावा लागेल कारण ही घटना कुडाळमध्ये घडली आहे. पुन्हा आम्ही २२.०५.२०१७ रोजी कुडाळ येथील पोलीस स्टेशनला गेलो. त्यांनी तक्रार घेतो असे सांगितले पण घेतले नाही. तुम्हाला प्रत्येकाला मी कॉल करेन, त्यावेळी तुम्ही प्रत्येकाने येवून स्टेटमेंट नोंदवा असे पोलीस अधिकारी यांनी सांगितले. त्यांनी आम्हाला बोलावले परंतू आमच्या सांगण्यानुसार जबाब घेतलेला नाही. त्यानंतर आम्ही वारंवार कुडाळ पोलीस स्टेशनशी संपर्क करत होतो. त्यावेळी झांजुर्णे साहेबांकडून तुम्हाला बोलावले जाईल असे वारंवार सांगितले व त्यानंतर आम्हाला डायरेक्ट ०६.०६.२०१७ रोजी आपली फिर्याद नोंदवली आहे असे सांगण्यात आले. ही फिर्याद आशा लिंबराज कराड व इतर असा उल्लेख करुन नोंदवण्यात आलेली आहे. आम्हाला जबाबासाठी बोलावणे आलेले नव्हते. तुम्हाला कोर्टाकडून बोलावणे येईल, त्यावेळेस तुमचे काय म्हणणे असेल ते सांगा असे सांगण्यात आले. वर्षा कांबळे व इतर आरोपींना मी ओळखू शकतो. आजरोजी न्यायालयात वर्षा विलास कांबळे व मंगल कांबळे या हजर आहेत. मला प्रसाद पवार या नावाने समन्स आलेले आहे, परंतू माझे प्रसन्न विनायक पवार असे आहे. माझ्या भावाचे नाव प्रसाद आहे. माझ्या भावाचा या केसशी काही संबंध नाही. माझा केसशी संबंध असल्यामुळे मी साक्षीला आलेलो आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती.पी.डी.गोरे यांचेमार्फत उलटतपास सुरु</u>**

२. मी पोलीसांसमोर जबाब दिलेला नाही. मी पोलीसांना तोंडी सांगितले होते. मी कुडाळ येथे राहणारा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आपुलकी मतिमंद शाळा ही पाचवडला

आहे. हे म्हणणे खरे आहे की, सांजवात शिक्षण संस्था, मनमंदिर मतिमंद मुलांची शाळा, कुडाळ येथे आहे. २०१७ साली माझे पदवीचे शिक्षण पूर्ण झाले होते. मला मराठी लिहिता वाचता येते. माझे इंग्रजी कच्चे आहे. नोकरी भरतीची जाहीरात टीव्ही, पेपरच्या माध्यमातून दिले जाते. हे म्हणणे खरे आहे की, कोणती पदे रिक्त आहेत हे जाहीरातीमधून नमूद केलेले असते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये पगार किती, शिक्षणाची अट, वय नमूद केलेले असते.

प्रश्न – तुम्हाला पोलीसांनी कुडाळ पोलीस चौकी, मेढा पोलीस स्टेशन असे तक्रार देण्यासाठी फिरवले व तुमची तक्रार घेतली जात नव्हती त्यामुळे तुम्ही पोलीस अधिक्षक, सातारा यांना तक्रार केली का ?

उत्तर – त्याबाबत आम्हाला माहिती नव्हते.

हे म्हणणे खरे आहे की, बीकेसी बांद्राला आम्ही तक्रार दिलेली नाही.

प्रश्न — वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांचे नातेवाईक आयडीबीआय बँकेत कामाला आहेत व ते तुम्हाला नोकरीला लावणार आहेत याबाबत तुम्ही व्यक्तीशः चौकशी केलेली नाही ?

उत्तर – तेवढा वेळ भेटला नाही.

हे म्हणणे खरे आहे की, कोणाला पैसे दिले घेतल्यास आपण पोहोच देतो घेतो. आरोपीला आम्ही पैशांची पोहोच मागितली होती, परंतू त्यांनी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपींना पैसे दिलेले नसल्यामुळे लेखी काही घेतलेले नाही. माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मी पोलीसांना शाब्दीक स्वरुपात सांगितला आहे.

प्रश्न – पोलीसांनी तुम्ही जे शाब्दीक सांगितले आहे ते लेखी का घेतले नाही याचे कारण सांगू शकता का ?

उत्तर – गाव पातळीवर पोलीसांवर राजकीय दबाव होता. तसेच, आम्हाला वारंवार ॲट्रॉसिटीची धमकी वर्षा कांबळे देत होत्या.

पोलीसांवर राजकीय दबाव होता तसेच आरोपी वर्षा कांबळे या ॲट्रॉसिटीची धमकी देत होत्या याबाबत पोलीस अधिक्षक, सातारा व मेढा पोलीस स्टेशन यांना पत्रव्यवहार केलेला आहे.

प्रश्न – ते कागदपत्रे तुम्ही दाखल केलेली नाहीत ?

उत्तर – ते कागदपत्रे आम्ही तपासी अधिकाऱ्यांना दिली होती.

प्रश्न – तुम्ही प्रसन्न पवार असल्याबाबत काही पुरावा आणला आहे का ?

उत्तर – मी आजरोजी आधारकार्ड आणलेले आहे.

(सदरचे आधारकार्डची पाहणी आरोपीचे वकीलांनी केली व सदर साक्षीदार हा प्रसन्न पवार असल्याची त्यांनी खात्री केली.) हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला मजकूर मी

आज प्रथमतःच कोर्टात सांगत आहे व खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पैशांचा व्यवहार आम्ही आरोपी क्र.१ सोबत केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांचा या घटनेशी काहीही संबंध नाही. आरोपी क्र.२ व ३ हे सांजवात शिक्षण संस्थेत काय पदावर कार्यरत आहेत हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

**ठिकाण** : मेढा
**दिनांक** : १६.०१.२०२४

रविंद्र भ. खवले,
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**